# जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कार्यालय
## शाखा:-अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, सोलापूर

दूरध्वनी व फॅक्स क्रं-०२१७-२७३१०००८

वाचले:-१.महाराष्ट्र शासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.:-साखर-१११५/प्र.क्र.GOI-२८/प्र.क्र.६९/ना.प-१९, दि.०४ जुलै २०१५

२.गोदाम पर्यवेक्षक, शासकीय धान्य गोदाम, रामवाडी, सोलापूर क्रं.गो.प/कावि/२०२/२०१५, दि.३०/०७/२०१५.

३. गोदाम पर्यवेक्षक, शासकीय धान्य गोदाम, रामवाडी, सोलापूर यांचा दि.३०/०७/२०१५ रोजीचा दैनंदिन धान्याचा अहवाल.

४.मंजूर कार्यालयीन टिपणी दि.३१/०७/२०१५

---

क्रं.२०१५/अधावि/कार्या-२७/प्रशा-१/आरआर/186 /२०१५ सोलापूर दि.३१/०७/२०१५

**विषय-माहे ऑगस्ट -२०१५ करिता दारिद्रय रेषेखालील शिधपत्रिकाधारकांना नियंत्रित करणेसाठी साखर वाटप आदेशाबाबत.**

**नियतन वाटप आदेश**

महाराष्ट्र शासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील वाचा क्रं.१ चे शासन निर्णयान्वये मे.विठ्ठल शुगर मिल्स, पो.म्हैसगांव, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूर यांचेमार्फत सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी साखर खरेदी करणेबाबत सूचना दिलेले आहे. त्यानुसार शासनाकडील उपरोक्त वाचा संदर्भ क्रं.१ अन्वये सोलापूर शहराकरिता माहे ऑगस्ट-२०१५ या महिन्यासाठी सोलापूर शहराअंतर्गत पात्र दारिद्रयरेषेखालील शिधापत्रिकाधारकांना वितरणाकरिता ३९७ क्विंटल साखर मंजूर केले आहे. तसेच गोदाम पर्यवेक्षक शासकीय धान्य गोदाम, रामवाडी, सोलापूर येथे माहे जुलै-२०१५ करिता वाटप करुन एकूण ७ क्विंटल साखर शिल्लक असलेबाबत उपरोक्त संदर्भ क्रं.३ अन्वये इकडील कार्यालयास अहवाल सादर केला आहे.

त्यानुसार सोलापूर शहराकरिता माहे ऑगस्ट-२०१५ या महिन्यासाठी सोलापूर शहराअंतर्गत पात्र दारिद्रयरेषेखालील शिधापत्रिकाधारकांना वितरणाकरिता ४०४ क्विंटल साखर वाटपासाठी उपलब्ध आहे.

(आकडे क्विंटलमध्ये)

| अ.क्र | परिमंडळ विभाग | कार्डसंख्या | लोकसंख्या | लोकसंख्येनुसार लागणारी साखर (१००% प्रमाणे) | मंजूर नियतन ८४.६६% प्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ | २९३१ | १३८८० | ६९.४० | ५९.०० |
| २ | ब | ४३९२ | १८८३६ | ९४.१८ | ८०.०० |
| ३ | क | ६८०८ | ३१९११ | १६१.१८ | १३८.५० |
| ४ | ड | ५९३७ | २९१५५ | १४५.७७ | १२६.५० |
| **एकूण** | | **२००६८** | **९३७८२** | **४७०.५३** | **४०४.००** |

extra-copy

परिमंडळ निहाय साखरेचे वाटप पुर्णांकात नमुद करुन दिलेले आहे. परिमंडळ अधिकारी यांनी दारिद्रय रेषेखालील कार्डधारकांना मंजूर नियंत्रित साखरेचे रास्तभाव धान्य दुकानदार यांचेमार्फत करावे. सदरचे नियतन वाटप आदेश प्राप्त होताच रामवाडी गोदाम शहर येथून साखरेची उचल **तीन दिवसात** करुन शिधापत्रिका धारकांना **तात्काळ** वाटप करावी.

सही/-XXXX
अन्नधान्य वितरण अधिकारी
सोलापूर

प्रति,

परिमंडळ अधिकारी अ,ब,क,ड विभाग, सोलापूर.

प्रत:- गोदाम पर्यवेक्षक, रामवाडी गोदाम, सोलापूर शहर यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

अन्नधान्य वितरण अधिकारी
सोलापूर